लोकमत

# कृषी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

पुणे : राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ व मुकुल माधव फाउंडेशनच्यावतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणार आहे.

याबाबतचा सामंजस्य करार नुक्ताच केला. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील एकूण ५९ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

कृषी शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढविण्यासाठी ही शिष्यवृत्ती जाहीर केली आहे. 'स्व. श्रीमती मोहिनी प्रल्हाद छाब्रिया शिष्यवृत्ती' असे या शिष्यवृत्तीचे नाव आहे.

याअंतर्गत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील कृषी पदवी अभ्यासक्रमाचे ३६ विद्यार्थी, कृषी पदव्युत्तरचे २० व आचार्य पदवीच्या ३ असे एकूण ५९ विध्यार्थ्यांना प्रतिवर्षी प्रतिविद्यार्थी ५० हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाईल. शैक्षणिक वर्ष २०१९-२० याची अंमलबजावणी सुरु केली जाणार आहे.

Hello Pune
Page No. 7 Jun 08, 2019
Powered by: erelego.com